ग्रामीण रुग्णालय, बार्शी जिल्हा सोलापूर येथील रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रशामा-२०१८/प्र.क्र.५०२/आ-३ अ
१० वा मजला, संकुल इमारत
गो.ते.रुग्णालय आवार, मुंबई-४००००१
दिनांक १५ जुलै ,२०१९

वाचा:-

सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर) मुंबई यांचे पत्र क. संआसे/ राज्यस्तर/ टे-७/कक्ष-३/ग्रा. रु. बार्शी,जि.सोलापूर श्रेणीवर्धन १०० /पुणे.मं १३ / जा.क्र.४१६६-६७ / १८ / दि. २८.११.२०१८

प्रस्तावना -

बार्शी जि. सोलापूर येथील ग्रामीण रुग्णालयाचे १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करणेबाबत आरोग्य सेवा संचालनालयाने प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुसार सदर रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय -

बार्शी जि. सोलापूर येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय स्थापन करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर श्रेणीवर्धीत १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयासाठी विहीत पध्दतीने जागा अधिग्रहीत करुन तेथे बांधकाम व पदनिर्मिती करणे याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१०१५४६१०१०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed4c738df60ac2ac776b9e2481f77ad50aba9dc28bb31a482e03c7ee7b6f64d8, serialNumber=7caa550613a8c4cb7c593368faa24e20d6f8985f510118e6fc1af8b04a443ee8, cn=Rajendra Shamraoji Kaurte
Date: 2019.07.15 14:17:13 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परीक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा, (रुग्णालये-राज्यस्तर) मुंबई.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सोलापूर.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर.
८. वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, बार्शी जि. सोलापूर.
९. नियोजन विभाग, (का.१४७२) मंत्रालय, मुंबई.
१०. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
११. कार्यासन अधिकारी, सेवा-२/सेवा-३/ सेवा-५/अर्थसंकल्प, सा.आ.वि. मंत्रालय, मुंबई
१२. निवडनस्ती (आरोग्य ३-अ)